RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

**वर्ष ११, अंक १३०]** **बुधवार, ऑक्टोबर १५, २०२५/आश्विन २३, शके १९४७** **[पृष्ठे १०, किंमत : रुपये १५.००**

**असाधारण क्रमांक ४६२**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक एफएसटी-०५/१९/प्र.क्र.१२६/वने-४.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या अधिसूचना, नियम, आदेश व अन्य इतर आदेश अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महसूल व वन विभागातील वनपाल, गट-क व वनरक्षक गट-क या पदांच्या सेवाप्रवेशांचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढीलप्रमाणे नियम विनिर्दिष्ट करीत आहेत :-

**१.** या नियमांना महसूल व वन विभागाच्या अधिपत्याखालील वनपाल गट-क व वनरक्षक, गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०२५ असे संबोधण्यात यावे.

**२.** या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) “नियुक्ती प्राधिकारी” याचा अर्थ, वनरक्षक पदावर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारा उप वनसंरक्षक (प्रा.)/ विभागीय वन अधिकारी (प्रा.) आणि वनपाल पदावरील नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारा मुख्य वनसंरक्षक (प्रा.)/ वनसंरक्षक (प्रा.) असा आहे ;

(ब) “वृत्त” याचा अर्थ आस्थापनाविषयक बाबींसाठी जबाबदार असलेले मुख्य वनसंरक्षक (प्रा.)/वनसंरक्षक (प्रा.) यांच्या नियंत्रणाखालील आस्थापनाविषयक प्रशासनास जबाबदार प्रशासकीय आस्थापना घटक ;

(क) “सक्षम प्राधिकारी” याचा अर्थ वनवृत्ताच्या बाबतीत मुख्य वनसंरक्षक (प्रा.) किंवा वनसंरक्षक (प्रा.) असा आहे ;

(ड) "पदवी" याचा अर्थ मान्यताप्राप्त सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता असा आहे ;

(इ) "अभियांत्रिकी किंवा तंत्रज्ञान/विज्ञान" याचा अर्थ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे तीन वर्षाचे पदविका अभ्यासक्रम प्रमाणपत्र परीक्षा. तथापि, यामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील अभ्यासक्रमाचा समावेश राहणार नाही असा आहे ;

(फ) "पदोन्नतीसाठी पात्रता" याचा अर्थ, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी यासंदर्भात निर्गमित केलेले नियम, शासन निर्णय किंवा आदेशाद्वारे पदोन्नतीसाठी विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार पात्रता असा आहे ;

(ख) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(ग) "उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा" याचा अर्थ महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. अधिनियम क्र. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो ;

(घ) "माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा" याचा अर्थ महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. अधिनियम क्र. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा असा आहे आणि त्यामध्ये शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो ;

(ज) "निवड समिती" याचा अर्थ, शासकीय सेवेतील वनरक्षक, गट-क च्या पदावरील सरळसेवा भरतीकरिता उमेदवारांच्या निवडीच्या प्रयोजनार्थ शासनाकडून वेळोवेळी गठित करण्यात आलेली समिती असा आहे ;

(झ) "प्रशिक्षण संस्था" याचा अर्थ वन विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या अशा संस्था किंवा महाविद्यालय किंवा विद्यालय किंवा अकादमी किंवा केंद्र, जेथे वानिकी व संलग्नित विषयासंबंधी प्रशिक्षण दिले जाते अशी प्रशिक्षण संस्था असा आहे.

**३.** वनपाल, गट-क या पदावरील नियुक्ती ही वनरक्षक, गट-क संवर्गाचे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा (प्रशिक्षण कालावधी वगळून) झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेनुसार व ज्येष्ठता अधीन पात्रतेनुसार योग्य व्यक्तीमधून पदोन्नतीने करण्यात येईल.

**४.** वनरक्षक गट-क या पदावरील नियुक्ती ही निवड समितीकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या व धाव चाचणीच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

(१) वयोमर्यादा. -

(अ) किमान वयोमर्यादा.- सदर पदभरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अठरा वर्षे पूर्ण असावे.

(ब) कमाल वयोमर्यादा.- सदर पदभरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अमागास प्रवर्गातील व्यक्तीचे वय पंचवीस वर्षे पूर्ण पेक्षा अधिक नसावे आणि मागास प्रवर्गातील व्यक्तीचे वय तीस वर्षे पूर्ण पेक्षा अधिक नसावे.

(२) किमान शैक्षणिक अर्हता.-

ज्या व्यक्तींनी विज्ञान किंवा गणित किंवा भूगोल किंवा अर्थशास्त्र या विषयासह उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केली आहे किंवा अभियांत्रिकी किंवा विज्ञान/तंत्रज्ञान विषयासह ३ वर्षाची पदविका उत्तीर्ण केली आहे.

परंतु असे की, माजी सैनिक व अनुसूचित जमाती प्रवर्गाचे उमेदवार हे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असल्यास ते वनरक्षक पदाकरिता पात्र राहतील.

(३) शारीरिक पात्रता.-

| (एक) | शारीरिक माप | प्रवर्ग | |
|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री |
| | किमान उंची (सें.मी.) | १६३ | १५० |
| | छाती | न फुगवता ७९ सेंटीमीटर्सपेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सेंटीमीटरपेक्षा कमी नसावा | - |
| | वजन(कि.ग्रॅ.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |
| (दोन) | अनुसूचित जमातीमधील उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे शिथिलक्षम राहील.- | | |
| | किमान उंची (सें.मी.) | १५२.५ | १४५ |
| | छाती | न फुगवता ७९ सेंटीमीटर्सपेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सेंटीमीटरपेक्षा कमी नसावा | - |
| | वजन(कि.ग्रॅ.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

दूरदृष्टी व जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याची खालील मानके पूर्ण करणे आवश्यक राहील:-

| दूरदृष्टी | | |
|---|---|---|
| अधिक चांगला डोळा | | वाईट डोळा |
| (सुधारलेली दृष्टी) | | |
| ६/६ | | ६/१२ |
| किंवा | | किंवा |
| ६/९ | | ६/९ |
| जवळील दृष्टी | | |
| अधिक चांगला डोळा | | वाईट डोळा |
| (सुधारलेली दृष्टी) | | |
| J.१ | | J.११ |

प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.

(४) नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी, प्राधिकृत शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याकडून उमेदवारांची वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रातांधळेपणा, आतल्या बाजूला फेंगडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग यासंबंधीच्या चाचण्यांचा समावेश राहील.

**५.** नियम ४ येथे नमूद केलेल्या पदावर निवड झालेल्या पुरुष उमेदवाराने ४ तासात २५ कि.मी. व महिला उमेदवाराने १६ कि.मी. चालण्याची शारीरिक क्षमता चाचणी पहिल्या प्रयत्नात पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि, सदर उमेदवार उपरोक्त नमूद कुठल्याही चाचणीत अपात्र ठरल्यास किंवा अनुपस्थित राहिल्यास, सदर उमेदवाराची निवड या टप्प्यावर रद्द ठरविण्यात येईल.

परंतु, असे की, गर्भवती महिला किंवा स्तनदा माता यांना त्यांच्या विनंतीनुसार व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने त्यांना चालण्याच्या चाचणीत भाग घेण्यासाठी अनुक्रमे दीड वर्ष व एक वर्षापर्यंत मुदतवाढ देता येईल. तथापि, गर्भवती महिला किंवा स्तनदा माता यांनी मुदतवाढीच्या कालावधीमध्ये चालण्याची चाचणी पूर्ण न केल्यास त्यांची सदर पदावरील निवड रद्द ठरविण्यात येईल.

परंतु, असे की, गर्भवती महिला व स्तनदा माता यांनी मुदतवाढीच्या कालावधीमध्ये चालण्याची चाचणी यशस्वीपणे पूर्ण केल्यास त्यांची ज्येष्ठता अबाधित राहील.

**६.** नियम ३ येथील पदावर पदोन्नतीने निवड झालेल्या व्यक्तीला एक महिना किंवा शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या कालावधीसाठी प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येईल.

**७.** (१) नियम ३ येथील पदावर पदोन्नतीने निवड झालेल्या व्यक्तीने जर दोन वर्षांच्या आत प्रशिक्षण पूर्ण न केल्यास, त्याला सदर प्रशिक्षण पूर्ण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय होणार नाही.

(२) विहित केलेल्या कालावधीनंतर प्रशिक्षण पूर्ण केल्यास, प्रत्यक्षात ज्या दिवशी प्रशिक्षण पूर्ण करील त्या दिवसापासून भविष्यातील वेतनवाढी अशा तऱ्हेने अनुज्ञेय राहतील, जणू काही कोणतीच वेतनवाढ रोखण्यात आली नव्हती, परंतु थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.

**८.** नियम ३ येथील पदावर पदोन्नतीने निवड झालेल्या पदावरील व्यक्तीने वयाची ५४ वर्षे पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणातून सूट अनुज्ञेय राहील. त्यानंतर भविष्यातील वेतनवाढी अशा तऱ्हेने अनुज्ञेय राहतील, जणू काही कोणतीच वेतनवाढ रोखण्यात आली नव्हती. परंतु थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.

**९.** (१) नियम ४ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या व्यक्तीस, त्याच्याकडून दोन जामीनदार असेलेले बंधपत्र घेऊन प्रशिक्षण संस्थेत सहा महिन्यांच्या किंवा शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या प्रशिक्षण पाठ्यक्रमासाठी पाठविण्यात येईल, त्यांना सदर पाठ्यक्रमाची अंतिम प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(२) जर एखादी व्यक्ती सदर विनिर्दिष्ट केलेला प्रशिक्षण पाठ्यक्रम किंवा अंतिम प्रशिक्षण परीक्षा प्रथम संधीत उत्तीर्ण होऊ शकली नाही, तर अशा व्यक्तीस स्वखर्चाने प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करण्यास व अंतिम प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी आणखी एक संधी दिली जाईल.

(३) जर सदर व्यक्ती दुसऱ्या संधीत प्रशिक्षण पाठ्यमक्रम व अंतिम परीक्षा उत्तीर्ण होण्यास असमर्थ ठरल्यास, बंधपत्रानुसार त्यांच्याकडून प्रशिक्षणाचा खर्च व प्रदान केलेले वेतन वसूल करण्यास तसेच तो सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील.

**१०.** नियम ४ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नेमणूक केलेल्या वनरक्षकांची आपापसातील ज्येष्ठता ही, स्पर्धा परीक्षेतील प्राप्त टक्केवारीला ५०% भारांकन देऊन व प्रशिक्षण संस्थेतील परीक्षेत प्राप्त केलेल्या टक्केवारीला ५०% भारांकन देऊन व दोन्हीची बेरीज करून त्याआधारे निर्धारित केली जाईल. (जर एका उमेदवाराने स्पर्धा परीक्षेत ७५% गुण व प्रशिक्षण संस्थेतील परीक्षेत ८०% गुण मिळविल्यास, अशा प्रकारे आपापसात ज्येष्ठता ठरविण्यासाठी त्या उमेदवाराचे गुण हे ३७.५+ ४०= ७७.५ इतके राहतील).

स्पष्टीकरणः- जर दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवारांचे प्राप्त एकूण गुण सारखेच असल्यास त्यांच्या वयाच्या आधारावर ज्येष्ठता निश्चित केली जाईल. जे उमेदवार वयाने ज्येष्ठ असतील अशा उमेदवारांचा क्रम कमी वयाच्या उमेदवारांच्या वर ठेवण्यात येईल.

**११.** नियम ३ व ४ येथील पदांवर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची ज्येष्ठता वनवृत्त स्तरावर ठेवण्यात येईल. तथापि, नियम ३ येथील पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवाराचे पुढील पदोन्नतीचे पद राज्यस्तरीय आहे. त्यामुळे नियम ३ येथील पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची एकत्रित ज्येष्ठता यादी राज्यस्तरावर ठेवण्यात येईल.

**१२.** नियम ४ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली नसेल तर, नियुक्तीनंतर संबंधित नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच नियम ३ येथील पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

**१३.** नियम ४ येथील पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार, नियुक्तीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास, याबाबतच्या नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत

सदर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत प्रमाणपत्र धारण न केल्यास, सदर संगणक प्रमाणपत्र धारण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच नियम ३ येथील पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

**१४.** (१) नियम ४ येथील पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतुदीनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमांनुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करताना त्यामध्ये दोन पेक्षा अधिक अपत्ये नियुक्तीच्या वेळेस हयात असल्यास संबंधित उमेदवार शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहील.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर त्याला दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिध्द झाले, तर ती व्यक्ती शासन सेवेकरिता अनर्ह राहील.

**१५.** नियम ३ व ४ येथील पदावर नियुक्त झालेला उमेदवार वनवृत्तांतर्गत कोठेही बदलीसाठी पात्र राहील.

परंतु असे की, नियम ३ व ४ येथील पदावर नियुक्त झालेल्या उमेदवाराची त्या वनवृत्तात पाच वर्षे नियमित सेवा पूर्ण झालेली असेल तर, त्याच्या विनंतीनुसार सेवाज्येष्ठता गमावण्याच्या अधीन राहून दुसऱ्या वृत्तामध्ये बदली करता येईल. अशा उमेदवारांची ज्या वनवृत्तामध्ये बदली करण्यात आली असेल, त्या वनवृत्तामध्ये त्याची सेवाज्येष्ठता त्या वनवृत्तामध्ये रुजू झाल्याच्या दिनांकास असलेल्या निम्नतम क्रमांकावर निश्चित करण्यात येईल.

**१६.** शासनाने वेळोवेळी कोणत्याही नियमाद्वारे, आदेशाद्वारे, किंवा निर्णयान्वये कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीसाठी विहित केलेल्या अटी व शर्ती संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मिलिंद म्हैसकर,**
शासनाचे अपर मुख्य सचिव (वने).

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated 14th October, 2025.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. FST-05/19/CR-126/Vane-4.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India and in supersession of all earlier notification, rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of the Forester, Group-C and Forest Guard, Group-C under the Revenue and Forests Department of the Government of Maharashtra, namely :—

**1.** These rules may be called the Forester, Group-C and Forest Guard, Group-C under the Revenue and Forests Department (Recruitment) Rules, 2025.

**2.** In these rules, unless the context requires otherwise,–.

(*a*) "Appointing Authority" means the Deputy Conservator of Forests (Territorial) or the Divisional Forests Officer (Territorial), as the case may be, who is competent to appoint the candidate to the post of Forest Guard, and Chief Conservator of Forest (Territorial) or the Conservator of Forest (Territorial), as the case may be, who is competent to appoint to the candidate to the post of Forester;

(*b*) "Circle" means the administrative unit under the control of the Chief Conservator of Forests (Territorial) or the Conservator of Forests (Territorial), as the case may be, who is responsible for administration of the establishment;

(*c*) "Competent Authority" means the Chief Conservator of Forests (Territorial) or the Conservator Forests Officer (Territorial) of the forest Circle, as the case may be;

(*d*) "Degree" means a degree of any discipline of Statutory University or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(*e*) "Diploma in Engineering or Technology or Science" means a diploma in Engineering of three years certified by Maharashtra State Board of Technical Education. However it does not include courses run by Industrial Training Institute;

(*f*) "Eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions prescribed for promotion by Rules, Government Resolution or Orders by General Administration Department of the Government issued in this behalf from time to time;

(*g*) "Government" means the Government of Maharashtra;

(*h*) "Higher Secondary School Certificate Examination" means the Higher Secondary School Certificate examination conducted by any Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965) and it includes any other examination declared by the Government to be equivalent thereto;

(*i*) "Secondary School Certificate Examination" means the Secondary School Certificate Examination conducted by the Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965) and it includes any other examination declared by the Government to be equivalent thereto;

(*j*) "Selection Committee" means a Committee constituted from time to time by the Government for the purpose of selection of candidates for direct recruitment to the post of Forest Guard (Group-C);

(*k*) "Training Institute" means a institute or college or school or academy or center run by Forest Department for conducting training courses in forestry.

**3.** Appointment to the post of Forester, (Group-C) shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority subject to fitness, from amongst the persons holding the post of Forest Guard (Group-C) having not less than three years of regular and continuous service (excluding training period) on the said post.

**4.** The appointment to the post of Forest Guard (Group-C) shall be made by nomination from amongst the candidates recommended by the Selection Committee on the basis of result of competitive examination conducted therefor, who fulfills the following criteria, namely:-

(*i*) Age Limit:-

***A*) Lower Age Limit-** Not less than eighteen years of age as on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the post.

***B*) Upper Age Limit-** Not more than twenty five years of age for the persons not belonging to reserved categories and thirty years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the post.

(*ii*) Minimum Educational Qualification.-

He shall have passed Higher Secondary School Certificate Examination with Science or Mathematics or Geography or Economics subject or three year diploma in Engineering or Technology or Science.

Provided that, candidate belonging to the Scheduled Tribe category or ex-servicemen who have passed Secondary School Certificate Examination shall be eligible.

(*III*) Physical Eligibility:—

| (*i*) | Physical Standards | Category | |
|---|---|---|---|
| | | Male | Female |
| | Minimum height (in c.m.) | 163 | 150 |
| | Chest girth | Shall not be less than 79 centimeters deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 centimeters | - |
| | Weight (in Kg) | Proportionate to height and age, as per medical standards | Proportionate to height and age, as per medical standards |
| (*ii*) | Relaxable in the case of candidates belonging to Scheduled Tribes as given below- | | |
| | Minimum height (in c.m.) | 152.5 | 145 |
| | Chest girth | Shall not be less than 79 centimeters deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 centimeters | - |
| | Weight (in Kg) | Proportionate to height and age, as per medical standards | Proportionate to height and age, as per medical standards |

The candidate shall fulfil following standard to distant and near vision with or without glasses, namely :-

| Distant Vision | | |
|---|---|---|
| Better eye | | Worse eye |
| (Corrected Vision) | | |
| 6/6 | | 6/12 |
| Or | | Or |
| 6/9 | | 6/9 |
| Near Vision | | |
| Better eye | | Worse eye |
| (Corrected Vision) | | |
| J.1 | | J.11 |

Each eye shall have full field vision.

(*IV*) The Government Medical Officer authorized in this behalf shall certify the medical fitness of candidates for appointment by nomination. The medical test shall consist of tests for squint eye, colour and night blindness, knock-knees, flat foot, skin and chest diseases.

**5.** A person selected to the post mentioned in rule 4 shall pass in his first attempt the walking test of 25 kilometers for male and 16 kilometers for female to be completed in 4 hours. If the person fails or remain absent to the walking test he shall not be eligible for the said Post and shall be disqualified for the appointment on the said post at this stage;

Provided that, pregnant women or lactating mother may make a request to the Competent Authority to extend the period for conducting the walking test maximum up to one and half year for pregnant women and maximum up to one year for lactating mother from the date of walking test. If the pregnant women or lactating mother does not complete the walking test within the said extended period then she shall be disqualified for the appointment on the said post;

Provided further that, if the extension is granted to such pregnant women or lactating mother her seniority shall remain intact only if she successfully complete the walking test within the said extended period.

**6.** A person appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall be sent for training for a period of one month or for the period as may be specified by the Government, from time to time.

**7.** (*1*) If a person holding the post mentioned in rule 3 by promotion fails to complete the training within the two years, he shall not be eligible for the annual increment till he complete the training.

(*2*) If he completes the training after the prescribed time period, his annual increments so withheld, shall be released with effect from the date of completion of the training and all future increments shall accrue, as if no increment was withheld. The arrears for past period shall not be admissible.

**8.** A person appointed on the post mentioned in rule 3 by promotion shall be exempted from completion of the training after completion of fifty four his age and he shall be liable for such increments withheld and arrears for past period shall not be admissible.

**9.** (*1*) A person appointed to the post mentioned in rule 4 by nomination after executing indemnity bond with two sureties, shall be required to undergo an induction training course for a period of six months or for the period as may be specified by the Government from time to time and shall pass a final training examination in the said course.

(*2*) If he fails to complete the specified training course or pass the final training examination in his first attempt, he shall be given one more chance to complete the training course and pass the final training examination at his own cost.

(*3*) If he is unable to complete the training course or pass the final examination in his second chance, he shall be liable to be discharged from service and shall be liable to repay the training cost and salary paid to him as per the indemnity bond so executed.

**10.** The inter-se seniority of the post mentioned in rule 4 appointed by nomination shall be determined by giving 50 percent weightage to the marks obtained in the Competitive Examination held during recruitment and giving 50 percent weightage to the marks obtained in the examinations held at the training institute. (Example:- If a person obtained 75 percent. marks in the Competitive Examination held during the recruitment and 80 percent marks in the examinations held at the training course, then the score of that person for determining inter-se seniority shall be 37.5+40= 77.5).

Explanation:- If the total marks obtained by two or more candidates are equal, the seniority shall be fixed on the basis of their age, the older in age being placed above the younger.

**11.** The seniority list of the candidates appointed to the post of mentioned in rules 3 and 4 shall be maintained at Circle level. However, the seniority list for next promotional post of persons appointed to the post under rule 3 is kept at State level. Therefore, consolidated seniority list of persons appointed to the post under rule 3 shall also be maintained at the State level.

**12.** Person to be appointed to the post mentioned in rule 4 by nomination, shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passes those examination.

**13.** A person to be appointed to the post mentioned in rule 4 by nomination, shall possess a Certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such Certificate of Computer Operations, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possess the same.

**14.** (*1*) A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rule 4 shall submit a Declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Small Family Declaration) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(*2*) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in Government Service.

(*3*) After appointment of a person in the Government service, If it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for Continuing on the said post in the Government Service.

**15.** A person appointed to the post mentioned in rules 3 and 4 shall be eligible to be transferred anywhere in the Circle:

Provided that, the candidates who are appointed to the post mentioned in rules 3 and 4 shall be transferred on request to other Circle only after completion of five years regular service, subject to loss of seniority in the circle from which he is to be transferred. The seniority of such transferred person in the circle in which he is transferred shall be fixed at lowest number on the date on which he joins the circle.

**16.** The terms and conditions specified by the Government, subsequent to the appointment of any Government Servant in any rules, orders or resolutions issued by the Government, from time to time, shall also be applicable to the Government Servant.

By order and in the name of Governor of Maharashtra,

MILIND MHAISKAR,
Additional Chief Secretary (Forests),
to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.